# भारतीय उत्तराधिकार (वारसा) अधिनियम १९२५ (महत्वाच्या तरतुदी)

भारतीय उत्तराधिकार (वारसा) अधिनियम ३० सप्टेंबर १९२५ रोजी अंमलात आला. त्याद्वारे परंपरेशी संबंधित सर्व भारतीय कायदे एकत्र करण्यात आले. या कायद्यात ११ भाग, ३९१ कलमे आणि ७ परिशिष्ट यांचा समावेश आहे. हा कायदा एकत्र कुटुंबातील, मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्ती आणि मृत्यूपत्र केलेले असल्यास त्यात नमूद उत्तराधिकारी यांना लागू आहे.

ब्रिटीशांना भारतात राज्य करतांना कायदे आनुषंगीकरित्या चालविणे आवश्यक झाले. यात मुख्यत: हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांचा विशेष विचार करणे आवश्यक होते कारण या दोन्ही समुदायाचे स्वत:चे वैयक्तिक कायदे त्यांच्या पवित्र ग्रंथांमध्ये दिलेले होते. याशिवाय अल्प लोकसंख्या असलेले पारसी, ख्रिश्चन इत्यादी इतर समुदायही होते, ज्यांची हिंदू किंवा मुस्लिम धर्मावर निष्ठा नव्हती आणि ते हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांपेक्षा भिन्न होते. या समुदायांवर हिंदू किंवा मुस्लिम धर्मीय कायदे लादणे योग्य नव्हते. या सर्वांचा विचार करुन भारतीय वारसाहक्क कायदा बनविण्यात आला.

सर्वसाधारणपणे मुस्लिम धर्मीय वगळता इतर सर्व धर्मीयांना उदा. हिंदू, ख्रिश्चन, पारसी इत्यादींना हा कायदा लागू होतो. भारतीय मुस्लीमांना या कायद्यातील फक्त काही तरतुदी लागू होतात. कोणत्या तरतुदी कोणत्या धर्माला लागू पडतील अथवा पडणार नाही हे त्या तरतुदीमध्येच या कायद्यात स्पष्टपणे दिलेले आहे.

या कायद्यान्वये मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या हिंदू, मुसलमान व पारसी वगळता इतर धर्मीय व्यक्तींचे वारस ठरविणेसाठी प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:-

**कलम ३२ :** मृत्यूपत्र न करता मृत्यू पावलेल्या व्यक्तीची मिळकत प्रथम त्या व्यक्तीची पत्नी किंवा पती अथवा अपत्ये व जवळचे नातेवाईक यांना पुढे दिलेल्या नियमांप्रमाणे वारसाने मिळते.
***स्पष्टीकरण-*** जर विवाहापूर्वीच विशिष्ट अधिकृत कराराने एखाद्या स्त्रिला तिच्या पतीच्या मिळकतीतील हिस्सा वारसाने मिळणार नाही असे ठरले असेल तर पतीच्या निधनानंतर त्याची विधवा म्हणून तिला कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

**कलम ३३ :** जेव्हा मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्तीच्या मागे त्याची (अ) विधवा आणि वंशपरंपरागत वंशज किंवा (ब) विधवा आणि जन्माने जोडले गेलेले नातेवाईक/ अपत्ये असतील किंवा फक्त (क) विधवा असेल तर
उपरोक्त (अ) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) भाग त्या विधवेला दिला जाईल व उर्वरित २/३ (दोन त्रित्यांश) हिश्याचीविभागणी नियमाप्रमाणे केली जाईल.
उपरोक्त (ब) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील १/२ (अर्धा हिस्सा) विधवेला मिळेल व उर्वरित १/२ (अर्धा हिस्सा) जन्माने जोडले गेलेल्या नातेवाईक/आपत्यांना मिळेल.
उपरोक्त (क) प्रमाणे असेल तर मयताच्या मिळकतीतील संपूर्ण मिळकत मयताच्या विधवेला मिळेल.

**कलम ३३(अ) :** (१) जेव्हा मयतामागे अपत्य अगर जवळचे नातेवाईक नसतात आणि फक्त विधवा असते तेव्हा आणि मयत व्यक्तीच्या मिळकतीचे मूल्य रुपये पाच हजार पेक्षा जास्त नसेल तर संपूर्ण मिळकत त्या मयताच्या विधवेला मिळते.

(२) जेव्हा उपरोक्त परिस्थितीत मिळकतीचे मूल्य रु. पाच हजारपेक्षा जास्त असेल अशावेळी त्या संपूर्ण मिळकतीवर त्या विधवेचा रुपये पाच हजारचा भार राहील आणि विधवेच्या पतीच्या मृत्यूच्या दिनांकापासून तर प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत द. सा. द. शे. ४ टक्के व्याजासह ती रक्कम मिळविण्याचा तिला अधिकार असेल.

(३) रुपये पाच हजारची केलेली तरतूद ही कलम ३३ मध्ये विधवेस दिलेल्या हक्काच्या अतिरिक्त असून त्याशिवाय उर्वरित मिळकतीची विभागणी कलम ३३ मधील तरतुदीप्रमाणे होईल.

(४) मिळकतीचे फक्त मूल्य ठरविताना त्यावरील देणे (कर्ज), मयताच्या उत्तरक्रियेसाठी व मिळकत व्यवस्थापनसाठी झालेला खर्च एकूण मूल्यातून वजा केला जातो.

(५) हे कलम खालील समाजघटकांना लागू पडणार नाही-

अ) भारतीय ख्रिश्चन

ब) मयताचे, त्याच्या मृत्यू समयी ख्रिश्चन असलेलेले नातू/नात किंवा मुले.

क) हिंदू, बौद्ध, शिख आणि विशेष विवाह नोंदणी कायदा १८७२ च्या कलम २४ च्या तरतुदी लागू असणाऱ्या व्यक्ती.

ड) मृत्युपत्र केलेल्या व्यक्ती.

**कलम ३४ :** जेव्हा मयत व्यक्तीच्या मागे त्याची विधवा किंवा जन्माने जोडले गेलेल्या नातेवाईक/आपत्यांपैकी कोणीही नसते तेव्हा मयताची मिळकत त्याच्या नातेवाईकांकडे नियमाप्रमाणे जाते. जेव्हा वरील कोणीही वारस शिल्लक नसेल तेव्हा ती मिळकत सरकारजमा होते.

**कलम ३५ :** विधवेला जे हक्क तिच्या पतीच्या मिळकतीत मिळतात तेच हक्क मृत्यूपत्र न करता मृत झालेल्या विधूर पतीला मयत पत्नीच्या मिळकतीत मिळतात.

**कलम ३६ :** मयताच्या मिळकतीची वाटणी (विधवा असल्यास, तिचा हिस्सा वजा केल्यानंतर) मयताच्या अपत्यांमध्ये विभागणी करण्याचे नियम कलम ३७ ते ४० मध्ये दिलेले आहेत.

**कलम ३७ :** जेव्हा मयत व्यक्तीमागे एकच अपत्य असेल व इतर कोणीही पूर्वी मयत झालेल्या अपत्याचे अपत्य नसेल तेव्हा पूर्ण मिळकत जिवंत असणाऱ्या त्या एकट्या अपत्याच्या मालकीची होईल. एकापेक्षा जास्त अपत्ये असतील तर त्या सर्वामध्ये ती समान हिश्श्याने वाटली जाईल.

**कलम ३८ :** जेव्हा मयतामागे कोणतेही अपत्य नसते मात्र अपत्याचे अपत्य अगर अपत्ये असतात. आणि इतर दूरचे मयत अपत्यामार्फतचे कोणी जिवंत नसते, तेव्हा जिवंत आसणाऱ्या अपत्याचे अपत्य (नात किंवा नातू) एकच असल्यास संपूर्ण मिळकत त्याच्याकडे जाईल व अशी एकापेक्षा जास्त आपत्ये असल्यास त्यांच्यामध्ये समान हिस्स्यात विभागली जाईल.

**कलम ३९ :** अशा प्रकारे मयत व्यक्तीची मिळकत वंशपरंपरेने येणाऱ्या वारसाकडे संक्रमीत होते.

**कलम ४० :** १) जेव्हा मयत व्यक्तीमागे शिल्लक असलेले वारस एकापेक्षा जास्त पिढीच्या अंतराने दुरचे व नजिकचे असे मिश्र स्वरूपात शिल्लक राहतात तेव्हा मयताच्या मिळकतीचे त्याचे अपत्यजन वारस व नातेवाईक विचारात घेऊन हिस्से करून सर्व कायदेशीर वारसांना हिस्से मिळतील असे वाटप होईल.

२) वरीलप्रमाणे असलेल्या हिश्यातील प्रत्येक हिस्सा वंशावळीनुसार अति नजिकच्या वारसास तर प्रत्येकी एक अशा मृत वारसास दिले जातात व असे हिस्से या वारसांच्या पुढील उत्तराधिकाऱ्याकडे संक्रमीत होतील अशा पध्दतीने वाटप केले जाते.

**कलम ४१ :** जेव्हा मृत व्यक्तीच्या मागे त्याच्या वंशवेलीतील कोणीही वारस नसतो तेव्हा इतर नातेवाईकामध्ये (विधवा जिवंत असल्यास तिचा हिस्सा वगळून) मृत व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन कलम ४२ ते कलम ४८ मध्ये दिलेल्या तरतुदी प्रमाणे केले जाते.

**कलम ४२ :** जर मृत व्यक्तीचे वडील जिवंत असतील तर ते मृत व्यक्तीचे उत्तराधिकारी ठरतील.

**कलम ४३ :** जेव्हा मृत व्यक्तीचे वडील जिवंत नसतात पण आई, भाऊ व बहिणी जिवंत असतात व कोणीही भाऊ किंवा बहीण मयत नसते तेव्हा व्यक्तीच्या मिळकतीचे समान हिस्से करुन आई, भाऊ व बहिणी यांना दिले जातात.

**कलम ४४ :** जेव्हा मृत व्यक्तीचे वडील जिवंत नसतात पण आई, भाऊ, बहिणी व मयत भाऊ व बहिणीची मुले जिवंत असतात तेव्हा मृत व्यक्तीच्या मिळकतीचे आई, जिवंत व मयत भाऊ, बहिणीच्या संख्येइतके समान हिस्से केले जातात व प्रत्येकी एक याप्रमाणे आई, जिवंत भाऊ, बहिणी व मयत भाऊ, बहिणीचे वारस यांना दिले जातात.

**कलम ४५ :** जर मृत व्यक्तीचे वडील जिवंत नाहीत पण आई जिवंत आहे आणि सर्व भाऊ-बहिणी मयत असून त्यांची मुले, मुली जिवंत आहेत असे असेल तर आई व मयत भाऊ-बहिण यांच्या संख्येइतके समान हिस्से गृहित धरून मिळकतीचे वाटप होईल. असे हिस्से संबंधित मयत भाऊ, बहिणी यांच्या वारसाकडे संक्रमीत होतील.

**कलम ४६ :** जेव्हा मृत व्यक्तीस त्याच्या आईशिवाय कोणीही वारस शिल्लक नसते तेव्हा अशा व्यक्तीची संपूर्ण मिळकत आईकडेच जाते.

**कलम ४७ :** जेव्हा मृत व्यक्तीचे आई वडील मयत असतात तेव्हा त्याची मिळकत त्याचे जिवंत व मयत भाऊ-बहिणी यांचेमध्ये समान हिस्स्याने वाटली जाते. मयतांचे हिस्से त्यांच्या वारसांकडे संक्रमीत होतात.

**कलम ४८ :** जेव्हा मृत व्यक्तीस आई, वडील, भाऊ, बहिणी किंवा त्यांचे वारस असे कुणीही उत्तराधिकारी नसतात तेव्हा मृत व्यक्तीच्या नजिकच्या पिढीतील जे नातेवाईक हयात असतील त्यांना सम-समान हिश्याने मृताची मिळकत मिळेल.

**कलम ४९** : जेव्हा मृत व्यक्तीच्या मिळकतीचे त्याच्या मुलांमध्ये किंवा वारसांमध्ये विभाजन केले जाते तेव्हा मृत व्यक्तीचे वारस हक्क मागणाऱ्या मुलाच्या, मुलीच्या अगर त्यांच्या अपत्याच्या पालनपोषणासाठी व विकासासाठी केलेला खर्च मिळकतीचे अथवा हिस्याचे मूल्यांकन करताना विचारात घेतला जात नाही.

## हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ (महत्वाच्या तरतुदी)

१७ जुन १९५६ या दिनांकापासून हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ अंमलात आला. या कायद्यामुळे प्रचलित हिंदू वारसा पध्दतीमध्ये बदल होऊन तो कायदा संहिताबध्द (कोडिफाय) झाला आणि एकत्र कुटुंबातील विनामृत्युपत्र मिळकतीचा वारसा कोणाकडे जातो हे या कायद्याने ठरविले गेले.

१७ जुन १९५६ या दिनांकापूर्वीच्या वारसा संबंधीचा विचार, त्यावेळेस प्रचलित रितीरिवाजाप्रमाणे तर १७ जुन १९५६ या दिनांकापूर्वी विधवा झालेल्या स्त्रिच्या बाबतीत 'द वुमेन्स राईट टु प्रॉपर्टी ॲक्ट', १९३७ (१४/४/१९३७) अन्वये केला जातो. १७ जुन १९५६ या दिनांकानंतर मयत झालेल्या स्त्री किंवा पुरुष यांच्या मिळकतीवरील वारसा हक्क हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ प्रमाणे ठरतो.

सन १९५६ पूर्वी, हिंदू कायद्याप्रमाणे एकत्र कुटुंबातील सहहिस्सेदारास 'सहदायक (कोपार्सनर)' असे म्हटले जात असे. सहदायक मयत झाला तर त्याचा वारसा इतर सहदायकांकडे जात असे. त्यामुळे सन १९५६ पूर्वी वारसा हा 'उत्तरजीवीता (सर्व्हायवरशिप)' ने होता असे म्हणतात.
सन १९५६ पूर्वी जर एखादा एकत्र कुटुंबात राहणारा परंतू त्याची स्वतंत्र मिळकत असलेला इसम मयत झाला तर त्याच्या मिळकतीचा 'उत्तराधिकार (सक्सेशन)' हा त्याच्या वारसांकडे जात असे. म्हणजेच सन १९५६ पूर्वी 'उत्तरजीवीता (सर्व्हायवरशिप)' आणि 'उत्तराधिकार (सक्सेशन)' अशा हक्क प्राप्त होणाऱ्या दोन वेगवेगळ्यात पध्दती होत्या.

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६ खालील व्यक्तींना लागू आहे :**

(अ) जी व्यक्ती धर्माने हिंदू आहे (वीरशैव, लिंगायत, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाजाचे अनुयायी)
(ब) जी व्यक्ती धर्माने बौध्द, जैन किंवा शिख आहे. किंवा हिंदू, बौध्द, जैन किंवा शिख धर्मात धर्मांतरित किंवा पुनर्धर्मांतरित झालेली आहे.
(क) जी व्यक्ती धर्माने मुस्लिम, ख्रिस्ती, पारसी किंवा ज्यू नाही.

**कलम ५ :** हा अधिनियम विशेष विवाह अधिनियम, १९५४ च्या कलम २१ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींमुळे भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ द्वारे विनियमित होणाऱ्या कोणत्याही मिळकतीस/संपत्तीस लागू असणार नाही.

**कलम ६ :** या कलमान्वये, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर जर हिंदू पुरूषाचा मृत्यू झाला तर त्याच्या मृत्यू समयी ज्या मिताक्षरा सहदायिकी (कोपार्सनर) मालमत्तेत त्याचा हितसंबंध असेल अशा बाबतीत त्याच्या त्या मालमत्तेतील हितसंबंध या अधिनियमान्वये नाही तर उत्तरजीवीताच्या (सर्व्हायवरशिप) तत्वानुसार सहदायिकीतील (कोपार्सनर) उत्तरजीवी सदस्यांकडे प्रक्रांत होईल.

परंतू मृताच्यामागे वर्ग १ मध्ये समाविष्ट असणाऱ्या स्त्री नातलग किंवा अशा स्त्री नातलगामार्फत दावा सांगणारा पुरूष नातलग हयात असल्यास मृताचा मिताक्षर सहदायिकी (कोपार्सनर) मालमत्तेतील हितसंबंध उत्तरजीवीताच्या (सर्व्हायवरशिप) तत्वानुसार नव्हे तर या अधिनियमान्वये प्रक्रांत होईल.

**कलम ८: पुरूषांच्या बाबतीत उत्तराधिकाराचा क्रम:**

**अ)** प्रथमत: त्याच्या वर्ग एकच्या वारसांकडे जातो.

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम ८ अन्वये वर्ग १ च्या वारसांची अनुसूची**

अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला तर त्याचा वारसा सर्वप्रथम पुढील बारा जणांना वर्ग १ चे वारस म्हणून मिळतो.

**वर्ग १ चे १२ +४ =१६ वारस मयताचा (१)** मुलगा **(२)** मुलगी **(३)** विधवा (एकाहून अधिक विधवा असतील तर सर्व विधवांना एकत्रीतपणे हिस्सा मिळेल) **(४)** मयताची आई **(५)** पूर्वमृत मुलाचा मुलगा **(६)** पूर्वमृत मुलाची मुलगी **(७)** पूर्वमृत मुलीचा मुलगा **(८)** पूर्वमृत मुलीची मुलगी **(९)** पूर्वमृत मुलाची विधवा **(१०)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाचा मुलगा **(११)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची मुलगी **(१२)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलाची विधवा हे एकाचवेळी हिस्सा घेतील.

☞ **हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम- २००५, कलम ७ अन्वये वर्ग १ च्या वारसांच्या अनुसूचीमध्ये खालील चार वारस जोडले गेले आहेत.**

**(१३)** पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा **(१४)** पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीची मुलगी
**(१५)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीची मुलगी **(१६)** पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा

**ब)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ चे कोणीही वारस नसतील तर दुसऱ्यांदा वर्ग २ च्या वारसांकडे त्याचा वारसा जाईल.

**हिंदू उत्तराधिकार अधिनियम-१९५६, कलम ८ अन्वये वर्ग २ च्या वारसांची अनुसूची**

**वर्ग २ चे ९ वारस (एक)** *१)* वडील

**(दोन)** *१)* मुलाच्या मुलीचा मुलगा *२)* मुलाच्या मुलीची मुलगी *३)* भाऊ *४)* बहीण

**(तीन)** *१)* मुलीच्या मुलाचा मुलगा *२)* मुलाच्या मुलाची मुलगी *३)* मुलीच्या मुलाचा मुलगा *४)* मुलीच्या मुलीची मुलगी

**(चार)** ***१)*** भावाचा मुलगा ***२)*** बहिणीचा मुलगा ***३)*** भावाची मुलगी ***४)*** बहिणीची मुलगी
**(पाच)** ***१)*** वडीलांचे वडील ***२)*** वडीलांची आई
**(सहा)** १) वडीलांची विधवा ***२)*** भावाची विधवा
**(सात)** ***१)*** वडीलांचा भाऊ ***२)*** वडीलांची बहीण
***(आठ) १)*** आईचे वडील ***२)*** आईची आई
**(नऊ)** ***१)*** आईचा भाऊ ***२)*** आईची बहीण

**क)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ आणि वर्ग २ चे कोणीही वारस नसतील तर खालील वर्ग ३ च्या मृताच्या गोत्रजांकडे त्याचा वारसा जाईल.

**वर्ग ३ चे मृताचे गोत्रज खालील प्रमाणे आहेत :**

**वर्ग ३- मृताचे गोत्रज** मृताचे पितृबंधू, म्हणजेच रक्ताच्या संबंधामुळे किंवा दत्तक ग्रहणामुळे पूर्णपणे पुरुषांद्वारे संबंध असलेल्या व्यक्ती.

**ड)** अविभक्त हिंदू कुटुंबातील एखादा पुरूष विना मृत्यूपत्र मयत झाला आणि त्याला वरील वर्ग १ वर्ग २ आणि वर्ग ३ चे कोणीही वारस नसतील तर शेवटी खालील वर्ग ४ च्या, मृताच्या भिन्न गोत्रज असणाऱ्यांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

**वर्ग ४ चे मृताचे भिन्न गोत्रज** मयताचे मातृबंधू, म्हणजेच, रक्ताच्या नात्यामुळे किंवा दत्तक ग्रहणामुळे परंतू पूर्णपणे पुरुषांद्वारे संबंध नसलेल्या व्यक्ती.

**कलम ९: उत्तराधिकाराचा क्रम :**

✓ उपरोक्त वारसांच्या वर्गवारीत वर्ग एकमध्ये समाविष्ट असलेल्या वारसांना एकाच वेळी मालमत्ता मिळेल आणि वर्ग दोन, तीन आणि चारचे वारस वर्जित होतील.

✓ वर्ग दोनच्या वारसांना मालमत्ता मिळणार असेल तेव्हा वर्ग दोनच्या पहिल्या नोंदीत येणाऱ्या (वडील) वारसांना, दुसऱ्या नोंदीतील वारसांपेक्षा (मुलाच्या मुलीचा मुलगा, मुलाच्या मुलीची मुलगी, भाऊ, बहीण) प्राधान्य मिळेल. याप्रमाणे पुढे.

**कलम १० : वर्ग १ मधील वारसामध्ये संपत्तीचे वितरण :**

अकृतमृत्युपत्र व्यक्तीस वर्ग एक मधील वारस असतील तर त्याच्या मालमत्तेचा भाग त्यांच्यात पुढील नियमानुसार विभागला जाईल :-

***नियम १ -*** मयताची विधवा, किंवा एकाहून अधिक विधवा असतील तर सर्व विधवा एकत्रितपणे एक हिस्सा घेतील.

***नियम २ -*** मयत व्यक्तीचे हयात मुलगे आणि मुली आणि आई प्रत्येकी एक हिस्सा घेतील.

***नियम ३ -*** मयत व्यक्तीच्या प्रत्येक मयत मुलाच्या किंवा प्रत्येक मयत मुलीच्या खात्यातील वारस त्यांच्यात मिळून एक हिस्सा घेतील.

***नियम ४ -*** नियम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या हिस्स्यांचे वितरण मयत व्यक्तीच्या मयत मुलाच्या खात्यातील वारसांमध्ये अशा प्रकारे करण्यात येईल की, त्याची विधवा (किंवा त्याच्या विधवा एकत्रितपणे) आणि हयात मुलगे व मुली यांना समान अंश मिळतील आणि त्याच्या मयत मुलांच्या शाखेला तेवढाच अंश मिळेल.

मयतास वरील वर्ग १) पैकी कोणीही वारस नसेल तर पुढील वर्ग २) च्या वारसांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

**कलम ११ : वर्ग २ मधील वारसामध्ये संपत्तीचे वितरण:**

**मयतास** वर्ग १) मधील वारस नसल्यास वर्ग २) मधील वारस विचारात घेतले जातात. तथापी, वर्ग १) मधील वारसाप्रमाणे एकसमयावच्छेदेकरून हिस्सा मिळण्याचा हक्क वर्ग २) मधील वारसांना नाही. (अकृतमृत्युपत्र व्यक्तीची) संपत्ती प्रथमत: वर्ग २) (एक) मध्ये नमुद केलेल्या वारसांकडे समान हिश्श्यांमध्ये प्रक्रांत होईल. वर्ग २) (एक) मधील वारस नसल्यास ती वर्ग २) (दोन) मध्ये नमुद केलेल्या वारसांकडे (समान हिस्स्यांमध्ये) प्रक्रांत होईल. वर्ग २) (एक) आणि (दोन) मधील वारस नसल्यास, ती वर्ग २) (तीन) मधील सर्व वारसांकडे समान हिश्श्यांमध्ये प्रक्रांत होईल. आणि याप्रमाणे पुढे.

**<u>टीप-</u>** वर्ग दोनमधील भाऊ किंवा बहीण यामध्ये एकच आई परंतु भिन्न वडील असलेला भाऊ किंवा बहीण यांचा समावेश होत नाही. विनामृत्युपत्र खातेदाराची संपत्ती सर्वांना समान हिस्सा मिळेल अशा प्रकारे वर्ग २) मध्ये नमूद केलेल्या वारसांमध्ये वाटली जाईल. उदाहरणार्थ, २) (एक) मध्ये नमुद केलेले वडील वारस असल्यास सर्व संपत्ती त्यांना मिळेल. वडील हयात नसल्यास सर्व संपत्ती २) (दोन) मधील सर्व वारसांकडे समप्रमाणात प्रक्रांत होईल.

अकृतमृत्युपत्र व्यक्तीस वरील वर्ग १) आणि वर्ग २) पैकी कोणीही वारस नसेल तर पुढील वर्ग ३) च्या मृताचे गोत्रज असणाऱ्या वारसांकडे मयताची संपत्ती वारसा हक्काने जाते.

**कलम १४ : हिंदू स्त्रिची मालमत्ता :**

या अधिनियमापूर्वी किंवा नंतर, हिंदू स्त्रिची, तिच्या कब्जात असलेली कोणतीही संपत्ती, मग अशी मालमत्ता तिला विवाहापूर्वी किंवा नंतर वारसाहक्काने, मृत्यूपत्रीय दानाने, वाटणीमध्ये पोटगी म्हणून, नातलगांकडून मिळालेली असो किंवा तिने अशी मालमत्ता स्वत:च्या कौशल्याने, परिश्रमाने किंवा एखादी संपत्ती दान म्हणून, मृत्यूपत्रान्वये, इतर कोणत्याही लेखान्वये, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये, आदेशान्वये किंवा एखाद्या निवाड्यान्वये संपादित केली गेली असेल किंवा अन्य कोणत्याही मार्गाने संपादित केलेली असो, अशी संपत्ती, हिंदू स्त्री संपूर्ण स्वामी म्हणून धारण करील, मर्यादित स्वामी म्हणून नव्हे.

तथापि, असे दानपत्र, मृत्युपत्र, अन्य लेख, हुकूमनामा, आदेश किंवा निवाडा काही अटी किंवा शर्तीच्या आधिन ठेवल्यामुळे संपत्तीत निर्बंधीत अधिकार निर्माण होत असतील तर अशा संपत्तीला या अधिनियमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

**कलम १५ : विनामृत्युपत्र मयत हिंदू स्त्रिची मालमत्ता :**

(१) विनामृत्यूपत्र मयत झालेली हिंदू स्त्री खातेदाराची संपत्ती पुढील प्रमाणे वारसाहक्काने जाईल.

अ) पहिल्यांदा, मुलगे व मुली (कोणताही मयत मुलगा किंवा मुलगी यांची अपत्ये धरून) आणि पती यांच्याकडे

आ) दुसऱ्यांदा, पतीच्या वारसाकडे

इ) तिसऱ्यांदा, तिच्या माता आणि पिता यांच्याकडे

ई) चवथ्यांदा, पित्याच्या वारसाकडे आणि

उ) शेवटी, मातेच्या वारसांकडे कलम १६ मध्ये दिलेल्या नियमानुसार प्रक्रांत होईल.

तथापि,

(क) हिंदू स्त्री जर विनामृत्यूपत्र मरण पावली तर तिला तिच्या पित्याकडून किंवा मातेकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) यांच्याकडे जाईल. असे वारस नसल्यास अशी संपत्ती मृत स्त्रिच्या पित्याच्या वारसाकडे प्रक्रांत होईल आणि

(ख) हिंदू स्त्रिला तिच्या पतीकडून किंवा तिच्या सासऱ्याकडून वारसा हक्काने मिळालेली कोणतीही संपत्ती, त्या मृत स्त्रिचा कोणताही मुलगा किंवा मुलगी (कोणत्याही मयत मुलाची किंवा मुलीची अपत्ये धरून) यांच्याकडे जाईल. असे वारस नसल्यास, मृत स्त्रिच्या पतीच्या वारसाकडे प्रक्रांत होईल.

**कलम १६ :** वरील कलम १५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसांमधील उत्तराधिकाराचा क्रम पुढील नियमानुसर असेल :

***नियम १ -*** कलम १५(१)(अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेले वारस त्यानंतर १५(१)(आ) मध्ये नमुद केलेले वारस आणि याप्रमाणे पुढे. तथापि, एकाच नोंदीत समाविष्ट असलेल्या वारसांना एकसमयावच्छेदेकरून वारसा मिळेल.

***नियम २ -*** जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीचा कोणताही मुलगा किंवा मुलगी, अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावला किंवा पावली असून, त्यांच्या मागे त्याची किंवा तिची स्वत:ची अपत्ये अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूसमयी हयात असतील तर, अशी मुलाची किंवा मुलीची अपत्ये त्यांच्यात मिळून, असा मुलगा किंवा मुलगी अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूसमयी हयात असता किंवा असती तर त्यांनी जो घेतला असता तो हिस्सा घेतील.

***नियम ३ -*** अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या संपत्तीची कलम १५ च्या पोटकलम (१) च्या खंड (आ), (इ) व (ई) व पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वारसांकडे होणारी प्रकांती जर ती संपत्ती, यथास्थिती पित्याची किंवा मातेची किंवा पतीची असती आणि अशी अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मृत्यूच्या निकटनंतर विनामृत्यूपत्र मयत झाली असती तर जो क्रम व जे नियम लागू झाले असते त्यांच्या अनुसार होईल.

**कलम १८ :** जर नातेसंबंधाचे स्वरूप अन्य प्रत्येक बाबतीत तेच असेल तर, अकृतमृत्यूपत्र व्यक्तीशी सख्ख्या नात्याने संबंधीत असलेल्या वारसांना, सापत्न नात्याने संबंधीत असलेल्या वारसापेक्षा अधिमान दिला जाईल.

**कलम २० : गर्भस्थ आपत्य :** अकृतमृत्यूपत्र खातेदाराच्या मृत्यूसमयी जे अपत्य गर्भात होते व नंतर जिवंत जन्मले, त्याला किंवा तिला जणुकाही अकृतमृत्यूपत्र व्यक्तिच्या मृत्यूपूर्वी जन्मले होते अशाच प्रकारे अकृतमृत्यूपत्र व्यक्तीचा वारस होण्याचा अधिकार असेल.

**कलम २३ : राहत्या घरासंबंधी :**

जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीला वारसदार कन्या असेल आणि जर ती अविवाहित असेल किंवा तिच्या पतीने तिला सोडून दिले असेल अथवा ती पतीपासून विभक्त झाली असेल किंवा ती विधवा असेल आणि ती अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या घरात राहत असेल तर तिला राहत्या घरात राहण्याचा अधिकार प्राप्त होईल.

**कलम २४ :** (हे कलम रद्द करण्यात आले आहे) : मुलाच्या मुलाची विधवा किंवा भावाची विधवा यांनी वाटप दिनांकाच्या वेळेस दुसरे लग्न केले असेल तर त्यांना अकृतमृत्यूपत्र खातेदाराच्या संपत्तीचा वारसा मिळण्याचा हक्क मिळत नसे. हे कलम आता रद्द करण्यात आले आहे.

**हिस्सा मिळण्यास अपात्र व्यक्ती :** पुढील व्यक्तींना वारसाने संपत्ती मिळण्यास अनर्ह ठरण्यात आले आहे :

**कलम २५ : खुनी व्यक्ती -** जी व्यक्ती खातेदाराचा खून करेल किंवा खून करण्यास अपप्रेरणा देईल ती खून झालेल्या खातेदाराच्या संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरेल.

**कलम २६ : धर्मांतरित व्यक्ती-** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, एखादी व्यक्ती धर्मांतर केल्याने हिंदू राहिली नसेल तर अशी व्यक्ती, धर्मांतरानंतर तिला झालेली आपत्ये व त्यांचे वारस एकत्र कुटुंबातील संपत्तीत वारसाने अथवा उत्तराधिकाराने हिस्सा मिळण्यास अपात्र ठरतील.

**कलम २७ :** वाटपास अपात्र व्यक्ती जणू काही मयत आहे असे समजून वाटप करण्यात यावे.

**कलम २८ :** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही व्याधी, वैगुण्य किंवा व्यंग असल्याच्या कारणावरून अथवा या अधिनियमात उपबंधित केलेले आहे ते खेरीज करून अन्य कोणत्याही कारणावरून कोणत्याही संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास अपात्र असणार नाही.

**कलम २९ :** जर अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या मागे अधिनियमाच्या उपबंधानूसार त्याच्या किंवा तिच्या संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास पात्र असेलला कोणताही वारस हयात राहिला नसेल तर अशी संपत्ती शासनाकडे प्रक्रांत होईल आणि शासन ती संपत्ती, वारस ज्यांना आधिन झाला असता त्या सर्व आबंधनांच्या व दायित्वांच्या आधिनतेने घेईल.

**कलम ३० :** कोणत्याही हिंदू पुरुष किंवा स्त्रिला त्याने/तिने मृत्यूपत्राद्वारे किंवा अन्य मृत्यूपत्रीय व्यवस्थेद्वारे विल्हेवाट करण्याजोगी असेल अशा कोणत्याही संपत्तीची भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेला व हिंदूना लागू असलेला अन्य कोणत्याही विधी यानूसार तशी विल्हेवाट करता येईल.

हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ लागू झाल्यानंतर खातेदार मृत्यू पावल्यास त्याच्या मालमत्तेचे उत्तराधिकारी ठरणारे त्याचे कायदेशीर वारसदार शोधून काढण्यासाठी, उपरोक्त वस्तूस्थिती विचारात घेण्यात यावी व त्यानंतर उत्तराधिकारासंबंधीचे आदेश देण्यात यावेत.

खातेदार मरण पावल्यावर, मयत खातेदाराच्या मालमत्तेचा उत्तराधिकार प्राप्त होणाऱ्या सर्व वारसांच्या नावाची (हिंदू उत्तराधिकार अधिनियम उपबंधान्वये) वारसाहक्क नोंदवहीत नोंद करावी लागेल. भू-संपत्ती सर्व वारसांमध्ये विभागण्यात आली असल्यास अशा सर्व वारसांची नांवे त्याच्या संबंधीत कब्जाप्रमाणे कब्जेदार म्हणून नोंदविण्यात यावीत. तथापि, भूसंपत्ती केवळ काही वारसांमध्येच विभागली असल्यास अशा सर्व वारसांची नावांची त्यांच्या कब्जाप्रमाणे नोंद करण्यात यावी. मयत खातेदराच्या वारसांची नावे (जमिनीचा कब्जा नसलेल्या परंतू मालमत्तेमध्ये अधिकार धारण करणाऱ्या) मालमत्तेमधील त्यांचा अधिकार व हितसंबंध दर्शविण्यासाठी, अधिकार अभिलेखाच्या “कब्जेदार” या स्तंभातच नोंदविण्यात यावीत. शक्यतो 'इतर अधिकार' स्तंभात नोंद करु नये. कारण कालांतराने 'इतर अधिकार' स्तंभातील नावे अनेक कारणांनी (अर्जामुळे, पुनर्लेखनात) कमी केली जातात आणि वारसा हक्कांना बाधा येते. हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदी, विखंडन प्रतिबंध व धारण जमिनीचे एकत्रिकरण संबंधीच्या अधिनियमाच्या किंवा कुळवहिवाट अधिनियमाच्या उपबंधांना कोणत्याही प्रकारे बाधक ठरत नाहीत.

☛ उपजत वेडा असणाऱ्या व्यक्तीला वाटपात हिस्सा मिळत नाही. परंतू त्याच्या मुलांना हिस्सा मिळु शकतो.

## हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-१९९४

भारताच्या संविधानाने कायद्यापुढे समानता हे धोरण स्विकारल्यामुळे फक्त स्त्रित्वाच्या कारणामुळे सहदायकी मालकीतून कन्येला वगळणे हे संविधानाच्या विरुध्द आहे आणि महाराष्ट्रात महिला कल्याणाच्या इतर सर्व धोरणांत मिताक्षर कायद्याने नियंत्रीत करण्यात येत असलेल्या संयुक्त हिंदू कुटुंबातील सहदायकाच्या कन्येला सहदायकीचा हक्क प्रदान करण्याची तरतुद असल्यामुळे महाराष्ट्र

शासनाने, दिनांक २२ जुन १९९४ रोजी हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६, महाराष्ट्रात लागू करतांना त्यात सुधारणा करुन हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम १९९४ लागू केला.

✓ हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम १९९४ कलम २ अन्वये हिंदू उत्तराधिकार अधिनियम १९५६, महाराष्ट्रात लागू करतांना त्याच्या कलम २९ नंतर पुढे प्रकरण ३० समाविष्ट केले गेले.
✓ प्रकरण २-क अन्वये "उत्तरजीवीत्वाद्वारे उत्तराधिकार" नावाचे प्रकरण समाविष्ट केले गेले आणि पुढील तरतुदी समाविष्ट केल्या गेल्या.

✓ **कलम २९-क:** कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -
**(एक)** मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या, ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे सहदायाद होईल आणि ती पुत्र असती तर तिला जे जे अधिकार, दायित्वे, नि:समर्थता प्राप्त झाली असती, ती प्राप्त होईल.
**(दोन)** उपरोक्त संयुक्त हिंदू कुटुंबामधील वाटणीच्या वेळेस पुत्राला वाटून देण्यात येत असलेल्या हिस्स्याइतका हिस्सा कन्येलाही मिळेल.
**(तीन)** उपरोक्त प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्यूपत्रद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.
**(चार)** उपरोक्त तरतुदी हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-१९९४ च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी (२२ जुन १९९४ पूर्वी) ज्या मुलींचे लग्न झाले आहे त्यांना लागू असणार नाही.
**(पाच)** दिनांक २२ जुन १९९४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

### हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम- २००५ (महत्वाच्या तरतुदी)

केंद्र शासनाने हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ हा हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ मध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी अंमलात आणला. यानुसार हिंदू उत्तराधिकार अधिनियम- १९५६ च्या कलम ६ मध्ये सुधारणा करुन
✓ हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) अधिनियम-२००५ कलम ६ (१) - मिताक्षर कायद्याने नियंत्रीत केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये सहदायकाची कन्या:
**(अ)** ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो, त्याच रीतीने जन्मापासून, तिच्या स्वत:च्या हक्कामुळे पुत्राप्रमाणेच सहदायाद होईल.
**(ब)** सहदायिकीतील मालमत्तेमध्ये तिला पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार असतील.
**(क)** सहदायिकीतील मालमत्तेमध्ये कन्येलाही पुत्राप्रमाणेच सर्व अधिकार, दायित्वे, प्राप्त होतील.
तथापि, दिनांक २० डिसेंबर २००४ पूर्वी ज्या वाटण्या घडून आल्या असतील त्यांना उपरोक्त तरतुदींमुळे बाधा येणार नाही.

**(२)** उपरोक्त प्रमाणे हिस्सा मिळालेली स्त्री, त्या हिस्स्याबाबत मृत्यूपत्रद्वारे किंवा अन्य प्रकारे अशा मिळकतीची विल्हेवाट सुध्दा लावू शकेल.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्यान्वये ९ सप्टेंबर २००५ पूर्वी जन्मलेल्या मुलींना तसेच दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असलेल्या हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क असेल अशी तरतुद केली होती.
मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६/१०/२०१५ रोजी दिवाणी अपिल क्र. ७२१७/२०१३ (प्रकाश आणि इतर विरुध्द फुलवती आणि इतर) प्रकरणात निकाल देऊन *'वडिलोपार्जित हिंदू अविभक्त कुटुंबातील मिळकतीत मुलाप्रमाणेच आणि मुलाइतकाच जन्मजात हक्क मिळणारी मुलगी आणि त्या मिळकतीत हक्क असणारा सहदायक (कोपार्सनर) हे दोन्ही दिनांक ९ सप्टेंबर २००५ रोजी हयात असावेत, मग ती मुलगी कधीही जन्मली असो.*' असे म्हटले आहे.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्याच्या कलम ४ अन्वये पूर्वीच्या कायद्यान्वये वारसाला, त्याच्या पूर्वजांनी (वडील, आजोबा, पणजोबा) घेतलेली कर्जे फेडण्याची जबाबदारी होती. याला 'पवित्र जबाबदारी (पायस ऑब्लिगेशन)' म्हटले जात होते. असे कर्ज वारसाने न फेडल्यास, असे कर्ज देणाऱ्यास न्यायालयात दाद मागता येत होती. केंद्र शासनाने सन २००५ च्या या सुधारीत कायद्यान्वये वारसाची, त्याच्या पूर्वजांनी (वडील, आजोबा, पणजोबा) घेतलेली कर्जे फेडण्याची जबाबदारी रद्द केली आहे व असे कर्ज देणाऱ्यास आता न्यायालयात दाद मागता येणार नाही अशी तरतुद केली आहे.

उपरोक्त सन २००५ च्या सुधारणा कायद्याच्या कलम ७ अन्वये वर्ग १ च्या वारसांच्या अनुसूचीमध्ये खालील चार वारस जोडले गेले आहेत.
(१) पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा, (२) पूर्वमृत मुलीच्या पूर्वमृत मुलीची मुलगी,
(३) पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीची मुलगी, (४) पूर्वमृत मुलाच्या पूर्वमृत मुलीचा मुलगा.

◉ सन २००५ च्या हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा- २००५ अन्वये हिंदू उत्तराधिकार (वारसा) अधिनियम-१९५६ मधील कलम ४(२), २३, २४ रद्द करण्यात आले आहेत.

**शब्दार्थ:**

* **वडिलार्जित मिळकत :** वडिलांकडून जी मिळकत वारसाने येते तिला वडिलार्जित मिळकत म्हणतात.
* **वाडिलोपार्जित मिळकत :** आजोबा किंवा पणजोबा यांच्याकडून जी मिळकत वारसाने येते तिला वाडिलोपार्जित मिळकत असे म्हणतात.

वडिलार्जित आणि वाडिलोपार्जित मिळकतीचे वाटप करता येते. एखादी व्यक्ती जर वडिलार्जित किंवा वाडिलोपार्जित मिळकत धारण करीत असेल तर त्याच्या मुलाच्या मुलाला आणि पणतूला त्या मिळकतींत जन्मत: किंवा दत्तक घेतल्यापासून, त्यातील हिस्स्यात हक्क प्राप्त होतो.

* **स्वकष्टाकर्जित मिळकत :** स्वत: कष्ट करुन, एकत्र कुटुंबाच्या पैश्याशिवाय कमावलेल्या मिळकतीला स्वकष्टाकर्जित मिळकत म्हणतात. स्वकष्टाकर्जित आणि एकट्याच्या मालकीच्या मिळकतीचे, हयातीत, वारस हक्काने वाटप होत नाही. अशी मिळकत कमविणारी व्यक्ती अशा मिळकतीची स्वेच्छेने विल्हेवाट लावू शकते.

* **सख्खे नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-पुरुषापासून, त्याच्या एकाच पत्नीच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सख्ख्या नात्याने संबंधित असतात.

* **सापत्न नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-पुरुषापासून, पण त्याच्याच निरनिराळ्या पत्नींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सापत्न नात्याने संबंधित असतात.

* **सहोदर नाते :** जेव्हा दोन व्यक्तींचा समान पूर्वज-स्त्रीपासून, पण तिच्या निरनिराळ्या पतींच्याद्वारे वंशोद्भव झालेला असतो तेव्हा त्या सहोदर नात्याने संबंधित असतात.
(पूर्वज-पुरुष यात पित्याचा तर पूर्वज-स्त्री यात मातेचा समावेश होतो.)

* **अकृतमृत्यूपत्र व्यक्ती :** ज्या व्यक्तीने त्याच्या मालमत्तेची मृत्यूपत्रांन्वये व्यवस्था केली नसेल अशी व्यक्ती.

* **गोत्रज :** जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने आणि संपूर्णपणे पुरुषांच्याद्वारे संबंधीत असल्यास एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची गोत्रज असते.

* **भिन्न गोत्रज :** जर दोन व्यक्ती रक्ताच्या किंवा दत्तकाच्या नात्याने आणि संपूर्णपणे पुरुषांच्याद्वारे नव्हे अशा संबंधीत असल्यास एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीची भिन्न गोत्रज असते.

* **आळियसंतान कायदा :** जर हा अधिनियम पारित झाला नसता तर व्यक्ती या कायद्यातील उपबंधाबाबत ज्या रुढीप्राप्त 'मद्रास आळियसंतान अधिनियम १९४९' अन्वये नियंत्रीत झाल्या असता तो कायदा.

* **वारसदार :** या अधिनियमान्वये अकृतमृत्यूपत्र व्यक्तीच्या संपत्तीची उत्तराधिकारी होण्यास पात्र व्यक्ती.

**स्वतंत्र मिळकती :** खालील मिळकती या स्वतंत्र मिळकती म्हणून गणल्या जातात. यांना वाडवडिलार्जित मिळकती म्हणता येत नाही.

***(अ) अडथळ्यांनी मिळालेली :*** जी मिळकत, वडील, आजोबा, पणजोबा व्यतिरिक्त इतरांकडून प्राप्त झालेली आहे. अशी मिळकत एकत्र कुटुंबाची किंवा एकत्र कुटुंबाच्या वारसा हक्कानी मिळालेली नसते.

***(आ) देणगी :*** लहानशी जंगम मिळकत, वडीलांनी प्रेमापोटी आपल्या मुलाला भेट म्हणून दिलेली असते. ती मुलाची स्वतंत्र मिळकत होते.

***(इ) सरकारी अनुदान :*** शासनाकडून प्राप्त झालेली मिळकत स्वतंत्र मिळकत होते.

***(ई) एकत्र कुटुंबाची परत मिळविलेली मिळकत :*** एकत्र कुटुंबाची, वाडवडिलांनी गमावलेली मिळकत जर त्याच एकत्र कुटुंबातील सदस्याने, एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे सहाय्य न घेता परत मिळविली तर ती त्याची स्वतंत्र मिळकत होते.

***(उ) कमावलेली मिळकत :*** स्वत:च्या स्वतंत्र मिळकतीतुन संपत्ती मिळवून, त्यातून घेतलेली मिळकत ही स्वतंत्र मिळकत होते.

***(ऊ) वाटपातील हिस्सा :*** वाटपातील हिस्सा ही स्वतंत्र मिळकत होते.

***(ऋ) एकटा वारसदार :*** मागे एकटाच जिवंत राहिल्यामुळे, वारस म्हणून मिळालेली मिळकत ही स्वतंत्र मिळकत होते.

***(ए) स्वकष्टार्जित :*** शिक्षणातून/नोकरीतुन, एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे सहाय्य न घेता, कष्ट करुन मिळविलेली मिळकत स्वतंत्र मिळकत होते.

**महत्वाचे न्याय निर्णय :**

✓ हिंदू विधवा स्त्रीला १९५६ नंतर तिच्या पतीच्या निधनानंतर मिळकत प्राप्त झाली तर ती त्या मिळकतीची संपूर्ण मालक बनते. व त्यानंतर त्या विधवेने लग्न केले तरीही तिला पती निधनानंतर मिळालेल्या मिळकतीवरील तिचा हक्क नष्ट  होत नाही. (ए.आय.आर. १९७१, मुंबई, ४१३)

✓ वडिलांनी वाटपात मिळालेल्या मिळकतीतून काही मिळकत खरेदी केल्यास ती मिळकत वडिलांच्या मालकीची होईल. त्या मिळकतीत त्यांचा मुलगा किंवा मुलगे सहदायाद (कोपार्सनर) नसतील. (ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २००५ (३), ७८९)

✓ एकत्र कुटुंबामध्ये एखादी मिळकत खरेदी केली असेल, आणि त्या खरेदीसाठीची रक्कत एकत्र कुटुंबाची होती असे सिध्द करावयाचे असल्यास, अशी मिळकत खरेदी करण्याच्या वेळेस, एकत्र कुटुंबाकडे पुरेसा पैशाचा गाभा (न्युकलस) होता हे सिध्द  करावे लागेल. (ए.आय.आर. १९६५, एस.सी.,२८९)

✓ विधवेची शिलभ्रष्टता तिला वाटपास अपात्र ठरवित नाही. विधवा जरी शिलभ्रष्ट असली तरीही तिच्या नवऱ्याचा हिस्सा तिला द्यावा लागेल. (ए.आय.आर. १९७६, कलकत्ता, ३५६; ए.आय.आर. १९७८, कलकत्ता, ४३१)

✓ हिंदू मॅरेज ॲक्ट, कलम १६ अन्वये वडिलांच्या मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा असतो. परंतू वडिलोपार्जित मिळकतीत अनौरस मुलांचा हिस्सा नसतो. तसेच दुसरी बायको असल्यास तिच्यापासून झालेली मुले वारस ठरतात. (ए.आय.आर. १९९६, एस.सी., १९६३; ए.आय.आर. १९८३, मुंबई, २२२)

✓ एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये सर्व सभासदांचा एकत्र हक्क व एकत्र कब्जा असतो. प्रत्येक सहवारसदारास सामाईक कब्जा व मिळकतीचा उपभोग घेण्याचा समान हक्क असतो. केवळ एखाद्या सहवारसदाराचा प्रत्यक्ष कब्जा नाही म्हणून त्याचा हक्क संपत नाही. एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमध्ये असणारा कब्जात जरी एकट्याचा असला तरीही असा कब्जा सर्वांचा मिळुन असतो. (ए.आय.आर. १९९५, एस.सी., ८९५)

✓ स्त्री-धनाची मिळकत ही त्या स्त्रिच्या संपूर्ण मालकीची असते. तिला त्याची वैयक्तिक इच्छेनुसार विल्हेवाट लावता येते. स्त्री-धन हिंदू एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचा भाग नसतो. (ऑल महाराष्ट्र रिपोर्टर २०११ (६), ४२८ एस.सी.)

✓ बेकायदेशीरपणे केलेल्या दुसऱ्या लग्नातील पत्नीला मयत नवऱ्याच्या मिळकतीत हक्क किंवा हिस्सा मिळत नाही. (ए.आय.आर. २००२, गोहत्ती,९६)

☞ **एकत्र हिंदू कुटुंबातील मिळकतीचे वाटप :**

**एकत्र कुटुंबाची मिळकत :** जरी मिळकत एकत्रीत असल्याबद्दलची धारणा असली तरी मिळकत एकत्र कुटुंबाची आहे हे शाबीत करावे लागते. एकत्र कुटुंबाची मिळकत ही एकत्र कुटुंबातील सर्व सदस्यांनी, एकत्र कुटुंबाच्यास पैशातून विकत घेतली आहे आणि त्या वेळेस एकत्र कुंटुंबामध्ये ती मिळकत खरेदी करण्याची आर्थिक क्षमता होती हे सिध्द करावे लागते.

**भारतीय नोंदणी कायदा १९०८ कलम १७ :** रुपये शंभर पेक्षा कमी मूल्य असलेल्या मिळकतीचे वाटप तोंडी होऊ शकते. भारतीय नोंदणी कायदा १९०८ चे कलम १७ अन्वये रुपये शंभरपेक्षा जास्त मूल्य असलेल्या मिळकतीचे वाटप हे लेखी आणि नोंदणीकृतच असावे.

मिळकतीचे वाटप करणे याचा अर्थ मिळकतीचे हस्तांतरण असा होत नाही. नव्याने मालकी आल्यास त्याला हस्तांतरण म्हटले जाते. एकत्र कुटुंबाच्या ज्या व्यक्तींमध्ये एकत्र कुटुंबाच्या मिळकतीचे असे वाटप केले जाते, त्या सर्वांचा त्या मिळकतीत सामाईक मालकी व सामाईक कब्जा असतो. अशी मिळकत मुळत: सर्वांच्याच मालकीची असते. अशी मालकी नव्याने येत नाही, त्यामुळे मिळकतीचे वाटप करणे याचा अर्थ मिळकतीचे हस्तांतरण असा होत नाही.
फक्त ७/१२ सदरी आणेवारी लागली म्हणजे वाटप झाले असे मानता येत नाही. फारतर तिला एक कौटुंबिक व्यवस्था मानण्यात येईल.

**वाटपाचे प्रकार :** वाटपाचे चार प्रकार आहेत. (१) वडिलांनी स्वत:च स्वत:मध्ये आणि मुलांमध्ये मिळकतीचे एकसारखे वाटप करणे. (२) वाटपासंबंधी करार (३) दावा दाखल करुन किंवा लवादामार्फत मिळकतीचे वाटप करणे. (४) एखाद्या सहदायिकाने (कोपार्सनरने), तो मिळकतीतून तुटक झाला आहे असे जाहीर केल्यामुळे होणारे वाटप.

**वाटपाचा दावा लावण्याचे हक्कदार :**

प्रौढ, सज्ञान सहहिस्सेदार, खरेदीदार, प्रत्येक सहदायक, विधवा, मयत मुलाची विधवा, अज्ञानाच्या हितासंबंधी दावा असल्यास, अज्ञान या सर्वांना वाटपासाठी दावा लावण्याचा हक्क आहे.
पत्नीला वाटपासाठी दावा लावता येत नाही परंतू वाटप जर तिच्या मुलामध्ये व नवऱ्यामध्ये झाले असेल तर तिला मुलाइतका हिस्सा प्राप्त होतो. (ए.आय.आर. १९७७, एस.सी., १९६४)

✓ हिंदू मॅरेज ॲक्ट, कलम १६ अन्वये लग्नापासून झालेल्या मुला-मुलींना वडिलांच्या मिळकतीत वारसा येतो व त्यांना दावा लावता येतो. परंतू सावत्र मुलाला, सावत्र वडिलांच्या मिळकतीत हक्क येत नाही.
✓ दत्तक घेतलेल्या मुला-मुलींना दत्तक आइ-वडिलांच्या संपत्तीत वारसाहक्क प्राप्त होतो.
✓ शारीरिक व मानसिक विकृती असलेल्या मुला-मुलींना वाटपात हिस्सा मिळतो.
✓ शिलभ्रष्ट आईला तिच्या मुलाच्या मिळकतीत हक्क प्राप्त होतो.
✓ घटस्फोट घेतलेल्या स्त्रीला तिने दुसरे लग्न केले असले तरीही मिळकतीत हक्क प्राप्त होतो.

✓ वाटपात जर एखादा सहहिस्सेदार वगळला गेला तर वाटपाचा हुकुमनामा शून्यनिय होतो. अशा प्रकरणात फेरवाटप करण्यात येते.

☞ **एकत्र कुटुंब मॅनेजरने एकत्र कुटुंबाची मिळकत विकणे :**

एकत्र कुटुंबाच्या मॅनेजरला एकत्र कुटुंबाच्या मिळकतीच्या फायद्यासाठी किंवा एकत्र कुटुंबाच्या गरजेसाठी एकत्र कुटुंबाची मिळकत विकण्याचा सशर्त अधिकार आहे. फक्त खाली दिलेल्या करणांसाठीच त्याला एकत्र कुटुंबाची मिळकत विकता येते अथवा गहाण ठेवता येते. या कारणांसाठी केलेले हस्तांतरण सहहिस्सेदारांवर बंधनकारक असते.

(१) सरकारी कर किंवा कुटुंबावर असलेले कर्ज फेडण्याससाठी

(२) सहहिस्सेदार किंवा कुंटुंबीयांच्या पोटपाण्यासाठी किंवा आजारपणासाठी

(३) सहहक्कदार किंवा सहहिस्सेदाराच्या किंवा त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या खर्चासाठी

(४) जरुरीचे कौटुंबीक अंत्यविधी संस्कार, श्राध्द किंव कौटुंबीक समारंभ खर्चासाठी

(५) एकत्र कुटुंबासाठी मालमत्ता मिळविण्यासाठी किंवा ती टिकविण्यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी

(६) एकत्र कुटुंबाच्या कर्त्यावर किंवा इतर सभासदांवर गंभीर फौजदारी तोहमत झाली असेल तर त्यांच्या संरक्षणासाठी करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी

(७) एकत्र कुटुंबाच्याण व्यलवसायासाठी काढलेल्या कर्जाची परतफेड करण्याौसाठी

(८) एकत्र कुटुंबाच्या इतर जरुरीच्या कारणांसाठी

उपरोक्त कायदेशीर गरजांसाठी संपूर्ण मिळकत विकण्याचा अधिकार फक्त कर्ता आणि वडिल यांनाच आहे. कायदेशीर गरज केवळ खरेदीपत्राच्या मजकुरावरुन सिध्द  होत नाही. त्यासाठी इतर सुसंगत पुरावा द्यावा लागतो. असा व्यवहार जर उपरोक्त कायदेशीर गरजांसाठी होत नसेल तर सहवारसदार मनाई हुकुमाचा दावा दाखल करु शकतात.

***वडिलांचा विशेषाधिकार:*** एकत्र कुटुंबाची मिळकत किंवा ज्या मिळकतीत मुलांचा किंवा मुलांच्या मुलांचा हिस्सा आहे अशी एकत्र कुटुंबाची मिळकत विकण्याचा, गहाण देण्याचा विशेषाधिकार वडिलांना आहे. पूर्वीचे, नैतिक व कायदेशीर कारणासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठीही अशी मिळकत विकण्याचा, गहाण देण्याचा विशेषाधिकार वडिलांना आहे.

♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦